दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१३५/२०२२ मधील नि.क्र.२७ वरील आदेश :
(श्रीमती सुवर्णा सरगडे वि. डॉ दिपक बनसोडे व इतर)

१) अर्ज, म्हणणे, सोबतची प्रतिज्ञापत्रे व इतर कागदपत्रे पाहिली, युक्तिवाद ऐकला, तसेच लेखी युक्तिवाद व अभिलेख पाहीले.

२) प्रस्तुतचा अर्ज अर्जदार हिने नि.२३ च्या आदेशाचा भंग करुन सामनेवाला यांनी न्यायालयीन आदेशाचा अवमान केला आहे याकरिता त्यांना तुरुंगात ठेवणे किंवा त्याची मिळकत जप्त करणेकामी केलेला आहे.

३) तिचे असे कथन आहे की, तिने प्रस्तुत अर्ज गार्डीयन अँड वॉर्ड कायदा कलम ७ व ८ च्या तरतुदींनुसार पालकत्व ठरवून मिळणेसाठी तसेच सामनेवाला यांचे पालकत्व काढून घेणेसाठी दाखल केलेला आहे. अर्जदार हिची नात कु. माही हिला प्रत्येक तारखेस न्यायालयामध्ये भेटण्यासाठी न्यायालयाने आदेश केलेला होता. परंतु सामनेवाला हे तिला न्यायालयात आणणेस जाणुनबुजून टाळाटाळ करीत आहेत. त्याकामी अर्जदार हिने नि.२३ अन्वये अर्ज दिलेला होता. त्या अर्जावर दि. १७.०३.२०२३ रोजी आदेश करताना, न्यायालयाने सामनेवाला क्र.१ व २ यांना त्यांनी दि.२७.०३.२०२३ रोजी स.५.०० वाजलेपासून ते दि.२८.०३.२०२३ रोजीच्या दु.१.०० वाजेपर्यंत ताबा देणेचा आदेश केलेला होता. त्यानुसार अर्जदार ही सामनेवाला यांचे घरी गेली असता ते घराला कुलूप लावून पळून गेलेले होते म्हणून ती संबंधीत पोलीस स्टेशनला तक्रार दाखल करणेस गेली, परंतु पोलीसांनी तिची तक्रार घेतली नाही. तथापी पोलीसांनी संबंधीत सामनेवाला यांना पोलीस स्टेशनला बोलाविले होते, परंतु तेथेही ते आले नाहीत. अशाप्रकारे त्यांनी न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन केल्यामुळे त्यांचेवर कार्यवाही व्हावी. सामनेवाला क्र.१ हा

व्यवसायाने डॉक्टर आहे म्हणून त्याच्या पदवीचे लायसेन्स रद्द करावे व दोन्ही सामनेवाला यांना तुरुंगात ठेवून त्यांची मिळकत जप्त करुन अर्जदार हिला नुकसानभरपाई देणेत यावी अशी मागणी त्यांनी या अर्जाद्वारे केली आहे.

४) सामनेवाला यांनी वरील अर्जावर प्रतिज्ञापत्रासह त्यांचे म्हणणे नि.क्र.३० अन्वये दाखल करुन अर्जातील कथने नाकारली आहेत. त्यांचे म्हणणे असे आहे की, दि.२७.०३.२०२३ रोजी अर्जदार या कोरेगाव येथे आल्याच नाहीत. त्या दि. २८.०३.२०२३ रोजी दु.१.०० वा. सामनेवाला यांच्या जुन्या घरी आल्या व कु. माही हिस धाकटया भावासह घेवून सामनेवालांचे आईवडिलांचे घरी जावून थांबल्या. तेथून त्यांनी कु.माही हिस सायंकाळी ५.०० वा. सामनेवाला यांचे घरी आणून सोडले. यावरुन अर्जदार कु.माहीच्या वडीलांच्या स्वतःच्या पुण्यतिथीच्या कार्यक्रमास गेल्याचे खोटे बोलत आहेत. केवळ न्यायालयाचा वेळ वाया घालविणेकरीता व सामनेवाला यांना नाहक त्रास देणेसाठी अर्जदार हिने खोटा अर्ज केलेला असून तो रक्कम रु.५००/- दंडाच्या रक्कमेसह रद्द करणेची विनंती केली.

५) अभिलेख पाहीला असता असे दिसते की, नि.२३ अन्वये अर्जदार हिने अर्ज करुन कु.माहीचे वडीलांचे पुण्यतिथीनिमीत्त तिची उपस्थितीत आवश्यक असलेने तिला दि.२८.०३.२०२३ रोजी मौजे एकसळ ता. कोरेगाव, जि. सातारा येथे सकाळी ८.०० वा.पासून रात्री ८.०० वा.पर्यंत तिची उपस्थिती ठेवणेबाबत अथवा तिचा तात्पुरती ताबा तीन दिवसांकरीता देणेबाबत विनंती केली होती. त्यावर उभय पक्षांचे म्हणणे ऐकून न्यायालयाने कु.माहीचा ताबा दि.२७.०३.२०२३ रोजी दु.३.०० वा. पासून अर्जदार हिला दि.२८.०३.२०२३ रोजीच्या दु. १.०० वा. पावेतो देणेचा आदेश केला होता. मात्र सदर आदेशात कोणी व कुठे ताबा द्यावा

याबाबत काहीही स्पष्ट निर्देश नव्हते. अर्जदार हिचे अर्जातील कथनानुसार, त्या कु.माहीस आणणेसाठी नेमक्या कुठे गेल्या याबाबत नमूद नाही. याउलट सामनेवाला यांचे कथनानुसार त्या मौजे एकसळ, ता. कोरेगाव, जि. सातारा येथे पुण्यतिथीच्या कार्यक्रमाला हजरच नव्हत्या व दुस-या दिवशी त्या ताबा घेणेसाठी आल्या होत्या आणि त्याच दिवशी त्यांनी ५.०० वा. कु. माही हिस पुन्हा आणून सोडले होते. वरील शपथेवरील कथने पाहता अर्जदार हिचे म्हणण्यात तथ्य दिसून येत नाही.

६) एकंदरीत अभिलेखाचे अवलोकन केले असता असे स्पष्टपणे जाणवते की, अर्जदाराचा प्रस्तुतचा अर्ज हा प्रकरण लांबविण्याचा प्रयत्न दिसतो, म्हणून हा अर्ज प्रामाणिकपणाचा वाटत नाही. सबब खालीप्रमाणे आदेश करणेत येत आहे.

## आदेश

१. अर्ज नि.क्र.२७ रक्कम रु.५००/- खर्चासह रद्द करणेत येत आहे. अर्जदार हिने सामनेवालाना यांना सदर खर्च द्यावा.

२. येणेप्रमाणे अर्ज निकाली.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहीर केला)

Digitally signed by KAMALA VIJAYKUMAR BORA
Date: 2024.05.10 16:07:26 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

**दि. ०९.०५.२०२४.**
**ठिकाण : सातारा**

**कमला वि. बोरा**
**जिल्हा न्यायाधीश-१ सातारा.**